सोलापूर महानगरपालिका,

दि.१९/०३/२०२०

# -: प्रेसनोट :-

विषय :- जन्ममृत्यू कार्यालय व अभिलेखापाल कार्यालयाकडील अर्ज स्विकारणेचे व दाखले देणेचे कामकाज दि.३१/०३/२०२० अखेर पर्यंत थांबविणेबाबत..

सोलापूर शहरातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशास अनुसरुन मा.जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सोलापूर यांनी, कोरोना विषाणूचा संसर्ग सोलापूर जिल्हयामध्ये पसरु नये म्हणून विविध कलमानुसार कोणत्याही ठिकाणी मोठया प्रमाणात लोकांचा समुह एकत्र जमू न देणेसाठी संपूर्ण सोलापूर जिल्हयामध्ये घेण्यात येणारे सभा, मेळावे, सामाजिक कार्यक्रम, जत्रा, यात्रा उरुस, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम, क्रिडा स्पर्धा इत्यादीवर दि.१४ ते ३१/०३/२०२० पर्यंत बंदी लागू करण्यात आलेचे आदेश पारित केलेले आहेत.

सध्या मनपामध्ये अभिलेखापाल कार्यालय व जन्ममृत्यू कार्यालयामध्ये नागरीकांची जन्म दाखले काढणेकरीता तसेच जन्ममृत्यूच्या नोंदी घेणेकामी नागरीकांची मोठयाप्रमाणात गर्दी होत आहे. शासनाने गर्दी टाळणेकरीता उपाययोजना करणेबाबत दिलेल्या निर्देशास अनुसरुन, होणाऱ्या गर्दीमुळे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळणेकरीता अर्ज स्विकृती व जन्ममृत्यू दाखले देणेचे कामकाज दि.२०/०३/२०२० पासून दि.३१/०३/२०२० पर्यंत थांबविण्यात आले आहे.. नागरीकांना अवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी या कालावधीमध्ये महानगरपालिकेमध्ये येऊन गर्दी करु नये.

Pawar

(अजयसिह पवार)
उप आयुक्त
सोलापूर महानगरपालिका